
दैनिक **लोकआरंभ**
लोकक्रांतीचा आरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | गुरवार ७ ऑगस्ट २०२५ | अंक २२९ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

### आजचा दिनविशेष

१९४७ : मुंबई महानगरपालिकेने बॉम्बे इलेक्ट्रिसिटी सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट कंपनी ताब्यात घेतली.








# असा समुद्र मराठ्यांना कधीच बघायला मिळणार नाही

## या लढाईचे तुम्ही साक्षीदार व्हा, जरांगे पाटील यांचा चलो मुंबई नारा

मुंबईला निघताना प्रत्येकाने आपआपली वाहने घेऊन निघायचे आहे. गेल्यावेळी आम्ही शांततेत गेलो आणि शांततेत आलो. आताही शांततेत जाणार आणि शांततेत येणार आहे. परंतू यावेळी आरक्षणाचा गुलाल उधळल्याशिवाय माघारी परतणार नाही. तीन वर्षांचा कालावधी आम्ही दिलेला होता. इतका वेळ कोणीच देत नाही. आम्ही सगेसोयऱ्याचे अध्यादेश काढणार या आश्वासनाला भुललो आणि परत आलो. परंतू आता आरपारची लढाई आहे, ज्यांना सामील व्हायचे त्यांनी यावे, असा जनसमुद्र मराठ्यांना कधीच बघायला मिळणार नाही, या लढाईचे तुम्ही साक्षीदार व्हा असे आवाहन करीत मराठा नेते मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. एक घर, एक गाडी कालपासून आम्ही नवीन मोहीम राबवली. सर्वत्र सभा घेतल्यानंतर बांधवांची चर्चा करतोय. धाराशिवपासून पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केला आहे. सोलापूरनंतर सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे आणि अहिल्यानगर दौरा असणार आहे. हा दौरा झाल्यानंतर मराठा बांधवांची चर्चा करून २९ ऑगस्ट रोजी सर्वांनी जायचं आहे. ज्याची नोंद निघाली त्यांनी गाडी घेऊन मुंबईकडे निघायचं, एक घर, एक गाडी निघणार असा नारा सोलापुरातून देतो आहे असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

### पाच हजार पाण्याचे टँकर लागणार

मुंबई जाताना शांततेत जायचं आणि शांततेत यायचं आहे.विजय मिळवल्याशिवाय परत यायचं नाही.सरकारने जर आपली माणसं आंदोलनात घुसवले तर एक इंचही मागे सरायचं नाही. मराठ्यांनी कुठेही जाळपोळ, दगडफेक करायची नाही. मुंबईकडे जाण्यासाठी पाच हजार पाण्याचे टँकर लागणार आहेत. मराठ्यांच्या डोक्यावरती आरक्षणाचा गुलाल टाकायचा म्हणजे टाकायचा असा निर्धार आहे. अंतरवाली सराटी येथून सकाळी दहा वाजता आम्ही निघणार आहोत असे मनोज जरांगे यांनी सांगितले.

# एक पेड माँ के नाम अंतर्गत गेवराई आश्रम शाळेत वृक्षारोपण सोहळा संपन्न

गेवराई : प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या स्कूल शिक्षा आणि साक्षरता विभागा अंतर्गत देशभरात इको क्लब स्थापन करून 'एक पेड माँ के नाम' या शीर्षकांतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीची मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात देशातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने, गेवराई येथील आश्रम शाळेत निवासी व अनिवासी विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षकवृंद आणि मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार विनोद नरसाळे उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या सहभागातून शाळेच्या परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने वृक्षारोपण केले



व त्यांची काळजी घेण्याची शपथ घेतली. पालकांनीही मुलांसोबत झाडे लावत पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्विकारली. या प्रसंगी शाळेतील दोन्ही मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, तसेच गैरशिक्षकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संपूर्ण शाळा परिवाराने परिश्रम घेतले. दरम्यान पर्यावरण संवर्धनासाठी असे उपक्रम राबविणे ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. वृक्षारोपण उपक्रमामुळे शाळेचा परिसर हिरवागार होण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल प्रेम व जाणीव निर्माण होणार आहे.

# डॉ. प्रीतमताई मुंडे यांची वैद्यनाथ बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड; मोहम्मद सलीम यांच्या हस्ते सत्कार

बीड (प्रतिनिधी)-माजी खासदार तसेच भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. प्रीतमताई साहेब यांची वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेच्या संचालक पदी नुकतीच बिनविरोध निवड झाली. या यशस्वी निवडीबद्दल भाजपाचे गट कार्यकर्ता मोहम्मद सलीम यांनी त्यांचा विशेष सत्कार केला. या वेळी मोहम्मद सलीम यांनी डॉ. प्रीतमताई यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. प्रीतमताई यांचं सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील योगदान वाखाणण्याजोगं असून, त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेचा



कारभार अधिक पारदर्शक आणि लोकहितकारी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्कार कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक यांची उपस्थिती होती. डॉ. प्रीतमताई यांनी आपल्या मनोगतात बिनविरोध निवडीबद्दल आभार मानत सांगितले की, ही निवड ही माझ्यासाठी सन्मानासोबतच जबाबदारीची जाणीवही आहे. सर्वसामान्य ग्राहकांच्या हितासाठी कार्य करत राहील. या निवडीमुळे डॉ. प्रीतमताई यांचे समर्थक व भाजपा कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विविध ठिकाणी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरवार ७ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## गुलकंद मराठी सिनेमा

गुलकंद हा मराठी सिनेमा पाहिला.ही कथा अगदीच प्रत्येकीच्या आयुष्यातील आहे,असं वाटतंय.(ज्यांना आवडले नसेल त्यांनी दुर्लक्ष करावे.) तारूण्य हे प्रत्येकाच्या जीवनात येत असते,तसेच प्रेम हे ही ओघाने आलेच की.. बालपणीचे प्रेम अगदीच निरागस असते .मी तर मुलींच्या शाळेत ५वी पर्यंत शिकले .पण आमच्या समोरचं मुलांचीही शाळा होती . शिवाय घरात तीन तीन भावंडे . त्यामुळे कधीही तिरस्कार करण्याचा विचार ही मनाला शिवला नाही, मैत्री म्हणजे नक्की काय .हे कॉलेजमध्ये गेल्यावर समजले. सगळेजण बहुतेक बाह्य सौंदर्यावर भाळतात. याचा अनुभव ही आला .पण हे आयुष्य आहे . चालायचंच.पण फक्त मुलगीच दिसायला सुंदर हवी ,असा प्रत्येक मुलाचा जवळपास हट्ट चं असतो. मुलींना आईवडील सांगतात मुलगा कसा ही असला तरी चालतो . कालांतराने ही पण प्रथा आजकाल बंद होताना दिसतेय .सगळेच जवळजवळ रिलेशनशिप मध्ये राहत असतात.लग्नाला आलेल्या मुलांचे ठीक आहे ओ.अर्थात आता तुम्ही म्हणाल यांचा आणि गुलकंद सिनेमा चा काय संबंध.तर मित्रांनो...

गुलकंद या सिनेमातील सई ताम्हणकर ने केलेली भूमिका किती स्पष्ट आणि सहजपणे स्त्रियांची मानसिकता दर्शवणारी आहे.पुरूष हा मैत्री नावाचे लेबल घेऊन येतो खरा .पण जर मैत्रीण दिसली तर तो तिला मैत्रीण म्हणून खरंच पाहतो का. ?यावर विचार करायला भाग पडते.कारण स्त्री पुरुष मैत्री आजही आपल्या कडे जास्त प्रचलित नाही .फक्त स्त्री मैत्रीच्या नात्याने बोलत असते .पण समोरचा मित्र फक्त तिला न्याहाळत असतो तो त्याच्या विचित्र भावनेतचं गुरफटलेला असतो. अशा वेळी या पुरूषांना आपला स्वत: चा संसार, मुलंबाळं असूनही इतर बायकांचा हव्यास का असतो. ,हे आजपर्यंत कधीही न उलगडलेले कोडे आहे.आपण कोणीतरी मोठी व्यक्ती आहे म्हणून ही लोकं धाडस करू पाहतात.!? सतत वाईटचं विचार स्त्रीच्या बाबतीत कशी करत असतात .

प्रत्येकीला एक स्वतंत्र कुटुंब आहेच ना.त्यातल्या त्यात ६०च्या पुढे गेलेली दोस्त मंडळी तर काय विचारूच नका .कोणतीही मैत्रीण दिसली की लगेचच * चल लॉंग ड्राईव्ह, चल डिनर ला.. यांना काही समजतच नाही का... या सिनेमातून खरंच जर कुणी चांगला मित्र होण्याचा प्रयत्न करत असेल तर खरंच त्याला सलाम करावासा वाटेल. उगाचंच सिनेमा वर खूप मोठं लिहूनही जर वृत्तीचं बदलणार नसेल तर अशा व्यक्तींना नक्की काय म्हणायचे आहे.तुम्हीच ठरवा बाबांनो...□ मला या फेसबुक वर आणि
मेसेंजरवर खूप छान मित्र आणि मैत्रीणी भेटल्या आहेत .काही जणी जरा आहेत हटके .पण तरीही चालतयं कि..मला इथे खूप चांगले व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्ती ही भेटल्या.जवळजवळ २०१४पासून आजपर्यंत कधीही वाईट न वागणारे मित्र मंडळी मला भेटल्या अशा माझ्या सर्व मित्र परिवाराला मनापासून धन्यवाद देते . आवर्जून गुलकंद हा सिनेमा पहाच.छान पद्धतीने मांडलाय.प्रत्येक क्षण नजरेतून निसटून जाऊ शकत नाही.सगळे कसे आताच डोळ्यासमोर घडतेय असेच दिसते.

अनिता प्रविण कळसकर

----------

ता.क.- जे मला वाटले ते मी इथे लिहलेय .कुणाचाही याच्याशी कसलाच संबंध नाही,याची कृपया नोंद घ्यावी. जर कुणाला तसे जाणवत असेल तर वृत्ती सुधारण्याची कृपा करावी.बस्स इतकेच.

## दया करणारे साधु म्हणजे माऊली दादा सत्यवान महाराज लाटे यांचे प्रतिपादन

# बाळनाथ महाराज यांची संजीवन समाधी आहे.





बीड प्रतिनिधी - दया ही साधु संतांच्या ठिकाणी राहत असते आणि दया करणारे साधु म्हणजे माऊली दादा आहेत. प्राणी मात्रावर प्रेम करणाऱ्याला पण साधु म्हणतात. वारकरी संप्रदायामध्ये उपोषण हे पंधरा दिवसाला मानले जाते ते म्हणजे एकादशी होय. विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने प्रति वर्षाप्रमाणे तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेल्या अखंड हरीनाम सप्ताह व गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील दुसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ. प. सत्यवान महाराज लाटे यांची संपन्न झाली. श्री क्षेत्र चाकरवाडी मधील बाळनाथ महाराज यांची समाधी ही संजीवन समाधी आहे. संत हे या भूतलावर कश्यासाठी येतात ? का येतात ? तीर्थ कश्याला म्हणतात, क्षेत्र कशाला म्हणतात, पवित्र म्हणजे काय, पुण्य कशातून मिळते. मानवाला जन्माला का यावे लागते. महात्माची, साधूची, संतांची पुण्यस्मरण का साजरे करावे.खरा परिचय हा तत्वाने होत असतो. प्रपंचाचे जीवन हे परमार्थीक कसे जगावे हे माऊली दादांनी दाखवून दिले आहे. माऊली दादांनी प्रपंचा मध्ये परमार्थ केला आहे. संतांच्या भूमी मध्ये सेवा करण्यासाठी पुण्य लागते, पाहिल्या जन्मीचे पुण्य असल्यामुळे मला चाकरवाडी मधे सेवा करायला मिळाली. महाराजांनी जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्या धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ॥ येथें उपकारासाठीं । आले घर ज्यां वैकुंठीं ॥ लटिकें वचन । नाहीं देहीं उदासीन ॥ मधुरा वाणी होटीं । तुका म्हणे वाव पोटीं या अभंगावरती चिंतन केले. महाराजांनी बोलताना सांगितले की ज्यांच्या अंगी दया आहे ते या जगात धन्य आहे.कारण ते येथे फक्त उपकारासाठी आलेले आहेत,त्यांचे घर हे वैकुंठा मध्ये आहे.ते कधी लटिके(खोटे)बोलत नाही,ते देहासंबंधी उदास असतात.तुकाराम महाराज म्हणतात त्यांच्या ओठात कायम मधुर वाणी असून,त्याच्या पोटी लोकांचे गुणदोष सहन करण्या इतकी भरपूर जागा आहे असे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. यावेळी गायनाचार्य सतीश महाराज जाधव, महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज, हनुमंत महाराज घोलप मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, परमेश्वर भोसले सर, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# अध्यां रात्री खड्डे बुजवण्याचा आटापिटा, कारण अजित दादा येणार बीडमध्ये!

बीड —— प्रतिनिधी, लोक इच्छा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांचा उद्या वडवणी तालुक्याकडे दौरा निश्चित झाला असून, त्याआधीच प्रशासनाने शहरातील खड्ड्यांकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः बार्शी नाका परिसरातील रस्त्यावर असलेले जीवघेणे खड्डे सध्या मुरूम टाकून भरले जात आहेत. हे काम अक्षरशः अर्ध्या रात्री युद्धपातळीवर सुरू आहे. दौराच कारण! कामांना अचानक गती!सामान्य नागरिकांनी कितीही तक्रारी केल्या तरी महिनोंमहिने दुर्लक्षित राहिलेले हे खड्डे, केवळ पालकमंत्र्यांच्या एका दौऱ्यामुळे ‘ताबडतोब’ बुजवले जात असल्याचं चित्र सध्या दिसत आहे. स्थानिक नागरिकांमध्ये यावरून संतापाची भावना असून, “दादा आठवड्याला एकदा बीडमध्ये यावे, म्हणजे प्रशासनाला कामांची आठवण होत राहील,” अशी उपहासात्मक प्रतिक्रिया देण्यात येत आहे. नागरिकांचा सवाल: रस्ते ‘व्हीआयपी’साठीच का?बार्शी नाका, सुभाष रोड, परळी रोड या प्रमुख मार्गांवर खड्ड्यांचा प्रश्न गंभीर असून, अनेक अपघातांचीही नोंद झाली आहे. तरीदेखील



सार्वजनिक दडपणाशिवाय कामं होत नाहीत, ही बाब धक्कादायक आहे. सामान्य जनतेसाठी हे रस्ते धोकादायक राहतात, पण जेव्हा पालकमंत्री किंवा मोठे नेते येतात, तेव्हाच कामं उरकली जातात, ही बाब व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. सारांश:अजित पवार यांच्या दौऱ्याचा फायदा रस्त्यांना होतोय, पण सामान्य नागरिकांच्या सुरक्षेची आठवण प्रशासनाला केवळ ‘व्हीआयपी’ येणार असल्यावरच का होते, हा प्रश्न उपस्थित राहतो.

# कुरेशी समाज यांना यश नक्की मिळणार

## कुरेशी समाज यांनी एकी दाखवली फळ जरूर मिळणार

माजलगांव प्रतिनिधि फेरोज पठाण , कुरेशी समाज हा परंपरेने मांस व्यापाराशी जोडलेला असून महाराष्ट्राच्या कृषी आधारित अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. त्यामुळे या समाजाच्या व्यापाऱ्यांवर आणि जनावरांची वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कुरेशी समाजाच्या विविध प्रश्नांसंदर्भात मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिली. बैठकीदरम्यानच उपमुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन



गडकरी यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करुन कुरेशी समाजाला जनावरांची वाहतूक करत असताना येत असलेल्या अडचणींबाबत माहिती दिली. जनावरांची वाहतूक करण्यासंदर्भात असलेल्या कायद्यात बदल करण्याबाबत कुरेशी समाजाच्या शिष्टमंडळाशी चर्चा करुन निर्णय घ्यावा, अशी विनंती त्यांनी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांच्याकडे केली. या बैठकीस आमदार सना मलिक, आमदार संजय खोडके, माजी मंत्री नवाब मलिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, फेडरेशन ऑफ महाराष्ट्रीय मुस्लिम, मुंबई अमन समिती, अल - कुरेश सामाजिक विकास मंडळ, ऑल इंडिया जमीयतुल कुरेश संघटना, ऑल महाराष्ट्र जमीयतुल कुरेश संघटना या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# हरवलेल्या विवेकाच हरित बीड अभियान म्हणजे रातभर पारवडलं, काही नाही सापडलं;फसव्या षडयंत्रात दादाचं गाड अडलं

बीड -- जिल्हा सध्या इव्हेंट आणि स्टंटबाजीच्या विळख्यात सापडला आहे. हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत हरित बीडचा इव्हेंट साजरा केला जाणार आहे. एकाच दिवसात तीस लाख वृक्ष लागवड करून देश पातळीवर नवा विक्रम करण्याची विवेकी संकल्पना मांडली गेली. उपक्रम चांगला आहे प्रत्येक नागरिकाची ती जबाबदारी आहे. मात्र तुती सारख्या झुडपाला वृक्षाचा दर्जा देऊन स्टंटबाजी केली जात असेल तर बेसरमालाही वृक्षाचा दर्जा दिला असता तर “दिसला खड्डा खव काटूक “मोहीम राबवता आली असती. यातून रस्त्यावर निर्माण झालेल्या खड्ड्यांना ही सहभागी होता आलं असतं. खड्डे खणण्याचा खर्चही वाचला असता. तीस लाखच काय तीस कोटी वृक्ष लागवड होऊन जिल्हा ॲमेझॉन जंगलासारखा झाला असता. तूतीला वृक्षाचा दर्जा देऊन केलेला हा इव्हेंट म्हणजे रातभर पाखडलं, काही नाही सापडलं आशाचं इव्हेंट च्या जाळ्यात अजित दादांचं गाड असं म्हणण्याची वेळ आली आहे.जिल्ह्याच्या बदनामीचं हे नव षडयंत्र असल्याचं जनतेत बोललं जाऊ लागला आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन जिल्ह्यात आल्यानंतर ते तरुण असल्यामुळे प्रशासकीय व्यवस्थेत बदल होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र इव्हेंट ची जॉन्सन मलमपट्टी करून रडतीचे डोळे पुसण्याचा प्रकार केला जात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. प्रामाणिकपणाने वृक्ष संवर्धनाचाच काम करायचा आहे तर जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध आरा गिरण्यांकडे त्यांनी दुर्लक्ष का केले आहे. वन विभागाला आतापर्यंत किती कारवाया केल्या अवैध वृक्षतोडीवर का आळा घातला नाही म्हणून धारेवर का धरले नाही हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे शेकडो वर्ष जगणारी वृक्षतोड करायला कायदे गुंडाळून बासनात बांधायचे अन दुसरीकडे स्टंटबाजी साठी तूतीला ही वृक्षाचा दर्जा देऊन इव्हेंट साजरा करायचा तोही अजित पवार सारख्या सुजाण नेत्यासमोर हे बीडच्या जनतेला मात्र पचणार नाही. अजित दादा या प्रकारावर जिल्हाधिकाऱ्यांना कानपीचक्या देतीलच अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्यात आजपर्यंतचा विकास आणि रस्त्यांना पडलेल्या



खड्ड्यांचा विचार केला तर सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा या खड्ड्यांमध्ये बेशरमाची झाड लावली. त्यातूनच अधिकाऱ्यांच्या कर्तबगारिने बोडखा झालेला जिल्हा हरित करण्यासाठी जॉन्सनची मलमपट्टी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी तुतीला जसा वृक्षाचा दर्जा दिला तसा बेसरमालाही दिला असता तर वेगळे खड्डे खांदून सरकारी तिजोरी रिकामी करायची वेळ आली नसती. आयत्या रस्त्यावरच्या खड्ड्यावरच बेशरमाचं काटुक खवून विक्रमाचा इव्हेंट साजरा करता आला असता. तीस लाख काय तीस कोटी वृक्ष लागवड देखील एकाच दिवसात पार पडली असती. महिना दीड महिन्यात ॲमेझॉन जंगलात स्वरूप जिल्ह्याला प्राप्त झालं असतं. हा एक नवा जागतिक विक्रम जिल्ह्याच्या नावावर नोंदला गेला असता. तीन वर्षानंतर तुतीची झाडं शेतकऱ्यांनी तोडल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या विवेकी जॉन्सन मलमपट्टीने जिल्हा पुन्हा बोडखा होणार नाही काय? विक्रमासाठी तुतीची झाड, कापसाची झाड वृक्ष म्हणून गणतीत धरायची काय? जर ती धरायची तर बेसरमाच्या झाडांनीच काय घोडं मारलं? कमीत कमी अजितदादा आपल्यासारख्या जमिनीवर पाय असणाऱ्या नेत्यांनी तरी आशा इव्हेंटला बळी पडायला नको एवढीच जनतेकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरवार ७ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दि. 7 ऑगस्ट, 2025 रोजीचा दौरा कार्यक्रम



बीड, दिनांक 06 : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दि. 7 ऑगस्ट, 2025 रोजीचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. उपमुख्यमंत्री श्री.पवार हे दिनांक 07 ऑगस्ट रोजी सकाळी 06.30 वा. विविध विकास कामांची पाहणी करणार आहेत. यामध्ये चंपावती क्रीडा संकुल पाहणी , श्री क्षेत्र कंकालेश्वर मंदिर परिसर पाहणी करणार आहे. सकाळी 09.30 वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन व इमारत बांधकाम पाहणी व महसूल भवनाचे भूमिपूजन करतील. सकाळी 10-00 वा श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखडा सादरीकरण / चर्चा. सकाळी 10.45 वा. जिल्ह्यातील मुख्य इमारतीच्या Elevation Plan चे सादरीकरण व चर्चा. सकाळी 11.30स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई -आराखडा सादरीकरण व चर्चा. दुपारी 12.30 ते 1.30 राखीव. दुपारी 01.30 वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे आगमन. १) ऊसतोड कामगारांचा मेळावा . २) आरोग्य मित्र योजनेचा शुभारंभ. ३) ग्रामीण गृहनिर्माण (घरकुल) Chat Bot. दुपारी 02.45 वा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सेवा सुविधा क्रमांक ३, बीड औद्योगिक क्षेत्र, बीड येथे आगमन. दुपारी 02.45 वा. Centre for Invention, Innovation, Incubation and Training (CIIIT), By Tata Technologies, Beed चे भूमिपूजन करतील. दुपारी 03.00 वा. खंडेश्वरी मंदिर परिसर, बीड येथे आगमन. दुपारी 03.00 ते 04.00 वा. जिल्ह्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमास उपस्थित राहतील. सांय 04.15 वा. स.मा. गर्गे पत्रकार भवन, तुळजाई चौक, बीड येथे आगमन व नंतर बीड जिल्हा पत्रकार संघाचा कार्यक्रमात उपस्थित राहतील. नंतर मोटारीने प्रयाण . सांय 05-30 वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे आगमन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. रात्रौ ०९.२५ वा. छत्रपती संभाजीनगर विमानतळ, छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व ०९.३० वा. विमानाने पूणेकडे प्रयाण करतील.



वैद्यकीय शिक्षण मंत्री.मा.हसन मुश्रीफ साहेब यांचे चिरंजीव. आमचे मित्र.मा.नवीद मुश्रीफ चेअरमन कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ (गोकुळ )युवराज पाटील संचालक कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ, किसनराव चौगुले राधानगरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अध्यक्ष, शशिकांत पाटील संचालक कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ मनोज फराकटे व्हाईस चेअरमन बिद्री साखर, विकासराव पाटील अध्यक्ष कागल तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,मयूर आवळेकर कागल तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष, निलेश शिंदे जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. व तसेच विकास हंबीरराव पाटील आमचे मित्र हे बीड वरून जात असताना.छत्रपती संभाजी महाराज चौक.येथे त्यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मी व मित्रपरिवार..

# श्री क्षेत्र चाकरवाडी महाराष्ट्रातच काय जगभरात पोहचली आहे नाना महाराज कदम यांचे प्रतिपादन

बीड प्रतिनिधी - चाकरवाडी येथील ग्रामस्थांच्या पूर्वजांनी पुण्य केले आहे सद्गुरु बाळनाथ महाराजांची तपश्चर्या फळाला आली म्हणून सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडी मध्ये आले आहेत. दादा श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आल्यापासून अखंड अन्नदान सेवा चाकरवाडी मध्ये सुरू आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह पार पडला यामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने भावी भक्तांनी महाप्रसाद घेतला. यावेळी चाकरवाडी ही महाराष्ट्रातच काय तर जगभरामध्ये पोहोचली आहे. जगभरातून आता दादा माऊलींच्या दर्शनासाठी भाविक भक्त चाकरवाडी या ठिकाणी येतात. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बाळनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे तपोनिधी शांतीब्रह्मा ह भ प महादेव महाराज ताया चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात



आले आहे. पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा झी टॉकीज फेम ह.भ.प.प्रा डॉ नाना महाराज कदम नेकनुर यांची संपन्न झाली. महाराजांनी जगद्गुरु श्री संत श्री तुकोबाराय यांच्या सुंदर ते ध्यान उभे विटेवरी या अभंगावर ती चिंतन केले. महाराजांनी चिंतन करत असताना परमात्म्याचे तटस्थ लक्षण व स्वरूप लक्षण सांगितले जगाचा मालक पांडुरंग परमात्मा किती सुंदर आहे हे सांगितले.अतिशय सुंदर असे विठ्ठलाचे ध्यान, कमरेवर हात ठेऊन विटेवर उभा आहे .त्याच्या गळ्यात तुळशीचा हार आहे पीतांबर नेसलेला आहे असे हे विठ्ठलाचे रूप मला नेहमीच आवडते .मसोळीच्या आकारची कुंडले त्याच्या कानात झळकत आहेत गळ्यात कौस्तुभमणी धारण केलेला आहे .तुकाराम महाराज म्हणतात की, हे ध्यान माझे सर्वसुख आहे असे सुशोभित ध्यान मी नेहमी आवडिने पाहीन. देवाकडे जा देव तुम्हाला मुक्त केल्या शिवाय राहणार नाही देवाकडे तुम्ही कोणत्या पण रूपात गेलात तर देवाला सगळे सारखेच असतात त्यासाठी देव तुम्हांला मुक्त केल्या शिवाय राहत नाही. असे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. विठ्ठल कोणाला म्हणावे, सुंदर कोणाला म्हणावे, आपले कोण आहे, देवाकडे का पाहावे, देवाकडे का जावे महाराजांनी सांगताना सांगितले की या जगामध्ये देवा शिवाय आपले कोणाच नाही.मानवाला सौंदर्य देणारा तो देव आहे, प्रत्येक मानवाला जे सौदर्य दिले आहे ते भगवान परमात्म्याने दिलेले आहे. देवापुढे कोणालाच माफ केलं जात नाही. आपले भविष्य पाहण्यासाठी कोणाकडे हात दाखवू नका आपले भविष्य चांगलेच आहे आपला वर्तमान चांगला असेल तर भविष्य चांगलेच आहे ज्याचे अंतःकरण स्वच्छ आहे, सुंदर आहे त्याला तुम्ही सुंदर म्हणा. आपले सौंदर्य हे कधी तरी संपणारे आहे देवाचे सौंदर्य कधी न संपणारे भारी आहे की देवाचे सौंदर्य हे कधीही संपणारे नाही ते आनंदमय आहे. अविनाशी आनंदघन अमूर्त मूर्ती मधुसूदन देवाच्या सौंदर्याकडे जर पाहील तर आनंद होतो.देव तुमच अंतःकरण पाहिल्याशिवाय राहणार नाही. महाराजांनी अभंगामधून भाविकांना अनेक संदेश देत आपली सेवा संपन्न केली. यावेळी गायनाचार्य सतीश महाराज जाधव, महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, म्हणजे पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य-राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार

### पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या अडकलेल्या ठेवी तत्परतेने द्या विद्युत वितरण प्रणाली, क्रीडा विकासाचाही घेतला आढावा

बीड, दिनांक ०७ : बीड जिल्ह्याच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य आहे. जिल्ह्यातील काही ठेवीदारांच्या ठेवी विविध पतसंस्थांमध्ये अडकलेल्या आहेत. त्या त्यांना मिळाव्यात यासाठी सहकार विभाग, पोलिस आणि जिल्हा प्रशासनाने यांनी समन्वयाने कार्यवाही करत ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्यात, याला प्राधान्य द्यावे. बीड जिल्ह्यातील विविध पतसंस्थांनी ठेवीदारांची फसवणूक केली असून यामध्ये आतापर्यंत सुमारे १३२ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यामध्ये १२८ आरोपींना अटक केली उर्वरीत आरोपींच्या अटकेबाबत पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यंत्रणेला दिल्या. यासह जिल्ह्यातील विद्युत वितरण प्रणाली, क्रीडा विकासाचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्ह्यातील मल्टीस्टेट व राज्यस्तरावरील नोंदणीकृत पतसंस्था ठेवी परत करण्याबाबत, जिल्हा विद्युत वितरण नियंत्रण समिती, जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या कामकाजाचा आढावा पालकमंत्री पवार यांनी घेतला. यावेळी सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, सहकार आयुक्त दीपक तावरे, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, अश्विनी सोनवणे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदींची उपस्थिती होती. पालकमंत्री पवार म्हणाले, कोणत्याही दबावाला



बळी न पडता अधिकाऱ्यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. गोरगरिबांच्या ठेवी लवकरात लवकर मिळतील, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. त्याची पतसंस्थांमध्ये ठेवीदारांच्या ठेवी परत मिळत नाहीत, अशा पतसंस्थांच्या मालमत्ता जप्त करण्याचे प्रस्ताव तातडीने गृह विभागाकडे पाठवावेत. मल्टीस्टेट, पतसंस्था प्रकरणांमध्ये गरजेनुसार केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचेही ते म्हणाले. ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा पातळीवर मोठ्याप्रमाणात प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृतीवर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या. अवसायानातील विविध पतसंस्था प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही सहकार आयुक्तांनी तातडीने करावी. बीड जिल्ह्यातील इतर वित्तीय संस्थांमध्ये अशाप्रकारे गुंतवणूकदारांची फसवणूक होऊ नये, यासाठी सहकार विभागाने चाचणी लेखा परीक्षण, विशेष लेखा परीक्षण करून घेण्याबाबत सहनिबंधक सहकार व सहकार आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. यासह त्यांनी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाचा आढावाही घेतला.

जिल्हा विद्युत वितरण संनियंत्रण समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला, यामध्ये जिल्ह्यातील भविष्यातील विजेची गरज लक्षात घेता, यंत्रणा बळकट करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यामध्ये त्यांनी स्थापित वीज पारेषण/ वितरण प्रणाली/ प्रस्तावित वीज वितरण प्रणाली, अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र व क्षमता वाढ, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना उपकेंद्र बळकटीकरण, मागेल त्याला सौर कृषी पंप, पीएम सूर्यघर योजना, सुधारित वितरण क्षेत्र योजना आदींसह प्रस्तावित अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र या बाबतचा आढावा घेतला. भविष्यातील गरज ओळखून तत्काळ वीज जोडण्या देण्यासाठी व दर्जेदार वीज पुरवठ्यासाठी वीज यंत्रणेचे सक्षमीकरणाला प्राधान्य देण्यात यावे, असेही पालकमंत्री पवार म्हणाले. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेंतर्गत करण्यात आलेल्या अर्जदाराला सहा महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या कामकाजाचा आढावा घेताना ते म्हणाले, जिल्हा क्रीडा संकुल बीडच्या रूपये २४९९.९६ लक्ष किमतीच्या अंदाज पत्रकास विशेष बाब म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील क्रीडा विकासात भर पडणार आहे. यासह त्यांनी जिल्ह्यातील क्रीडा विकासाची कामे गुणवत्तापूर्ण करावीत, असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले. चॅट बॉट व सेवा मित्र सुविधेचे उद्घाटन शासनाच्या विविध योजना सामान्य लोकांपर्यंत एका क्लिकमध्ये पोहोचविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नागरिकांना विश्वासार्ह, स्पष्ट आणि वेगवान सेवा पुरविण्यासाठी हा उपक्रम आहे. नागरिक आता त्यांच्या गरजेनुसार महत्त्वाची माहिती एकाच ठिकाणी अधिकृत आणि अद्यावत स्वरूपात पाहू शकतील, प्रस्तुत चॅट बॉटमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामधील विविध विभागांचे कार्यक्षेत्र स्पष्टपणे दर्शवले आहे. महसूल, निवडणूक, पुरवठा, संजय गांधी योजना, रोहयो, तक्रार निवारण आदी प्रमुख विभागांचा यामध्ये समावेश आहे. या अद्यावतीकरणामुळे नागरिकांना योजनेची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज कोठे व कसा करायचा, यासह सविस्तर माहिती चॅट बॉटमध्ये उपलब्ध आहे. याबरोबरच सेवा मित्र उपक्रमामध्ये विविध प्रकारचे प्रमाणपत्रे घरपोहोच देण्याची योजना आहे. जिल्ह्यातील डॉक्टर व आयएमए संघटना, व्यापारी, उद्योजकांशी चर्चा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील डॉक्टर व इंडियन मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील अडचणींबाबत चर्चा केली. संघटनेचे अध्यक्ष डॉ. अनंत मुळे व सचिव डॉ.अमोल गिते यांच्यासह जिल्ह्यातील डॉक्टरांनी आपल्या अडचणी मांडल्या. संघटनेकडून मांडण्यात आलेल्या अडचणीबाबत सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल. तसेच बीड जिल्हा रूग्णालयामध्ये आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्यासही प्राधान्य असेल, असेही पालकमंत्री पवार म्हणाले. तसेच जिल्ह्यातील उद्योजक व व्यापारी यांनीही त्यांच्या अडचणी मांडल्या व पालकमंत्री पवार यांच्याशी चर्चा केली. जिल्ह्यात सर्वांनी मिळून उद्योगास पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले.

******

## उत्तराखंडमध्ये अडकलेले नांदेड जिल्ह्यातील सर्व पर्यटक सुखरूप

### पर्यटकांच्या जिल्हा प्रशासन संपर्कात परतीच्या प्रवासाचे ही झाले नियोजन -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची माहिती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड - उत्तराखंडमधील केदारनाथ, बद्रीनाथ येथे दर्शनासाठी गेलेले नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील डोणगाव येथील सर्व ११ युवक सुखरूप असून त्यांच्याशी जिल्हा प्रशासनाचा संपर्क झाला आहे. त्यांच्या परतीच्या प्रवासाचेही नियोजन पूर्ण झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.



मंगळवारी उत्तराखंडमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे नांदेड जिल्ह्यातील ११ युवक अडकून पडले आहेत. हे सर्व युवक सुखरूप आणि पूर, भूस्खलन झालेल्या घटनास्थळापासून १५० किलोमीटर अंतरावर होते. उत्तरकाशी जिल्ह्यात धराली येथे ढगफुटी झाली आहे. त्यामुळे खीरगंगा नदीला मोठा पूर आला आहे. अनेक ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे घरांचे नुकसान झाले आहे. अनेक जण बेपत्ताही आहेत. नांदेड जिल्ह्यातील सचिन पत्तेवार ,शिवचंद्र सुकाळे, शिवा कुरे,स्वप्निल पत्तेवार , शिवा ढोबळे, धनंजय ढोबळे ,नागनाथ मुंके देवानंद गौण्डगे, अमोल कुरे, सोमनाथ चंदापुरे आणि देवानंद चंदापुरे हे युवकही उत्तरकाशी जिल्ह्यात सुखरूप आहेत. त्यांच्यातील सचिन पत्तेवार याच्याशी जिल्हा प्रशासनाने संपर्क साधला आहे. त्यांच्या सर्वांचे परतीच्या प्रवासाचेही नियोजन पूर्ण झाले असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले आहे.

# अंगदान जीवन संजीवनी अभियानांतर्गत अवयवदान जनजागृती रॅली

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : अंगदान जीवन संजीवनी अभियानांतर्गत ५-ऑगस्ट रोजी अवयवदान जनजागृती रॅलीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा यांच्या संयुक्त विद्यमाने बळीराम पाटील महाविद्यालय येथे करण्यात आले होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय पेरके जिल्हा आरोग्य अधिकारी





डॉ. संगीता देशमुख निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.राजाभाऊ बुट्टे नोडल अधिकारी डॉ.हनुमंत पाटील वैद्यकीय अधिक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अंगदान जीवन संजीवनी अभियान कार्यक्रमा अंतर्गत बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोकुंदा किनवट येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उपजिल्हा रुग्णालय, गोकुंदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जनजागृती अभियान अंगदान जीवन संजीवनी अभियानाचे आयोजन दि.५-ऑगस्ट रोजी करण्यात आले होते (आर.के.एस.के.समुपदेशक) पंकज राठोड (एन.सी.डी. समुपदेशक) कृष्णा निरडे यांनी विद्यार्थ्यांना अवयवदाना बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.गजानन वानखेडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. के.बेंबरेकर हे होते तर उपप्राचार्य डॉ.पंजाब शेरे, डॉ शुभांगी दिवे ,प्रा.डी.पी.चाटे, प्रा.अनिल पाटील डॉ.रत्ना कोमावार प्रा.सतिश मिरासे, प्रा.प्रल्हाद जाधव, प्रा. संतोष पवार प्रा.गंगाधर राहुलवाड यांच्या सह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरवार ७ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# दादा तुम्ही येता म्हणून बीडचे रस्ते चकाचक.

## मात्र तुम्ही येण्या अगोदर सर्वत्र खड्डे, आणि घाणीचे साम्राज्यच पसरलेले.!

बीड प्रतिनिधी : बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार सद्या बीड जिल्हा दौऱ्यावर असल्याने बीडमधील रस्ते, रस्त्यामधील खड्डे यांची जोरदार मलम- पट्टी मलमपट्टी चे काम सध्या बीड मध्ये पाहावयास मिळत आहे. मात्र बीड चे पालकमंत्री अजित दादा पवार साहेब आपण बीडला येणार असल्यावरच अचानक बीड शहरातील रस्ते, रस्त्यातील खड्डे, कचरा, हे प्रशासनाकडून चकाचक होऊ लागतात. मात्र पालकमंत्री साहेब आपण येण्या अगोदर आठ दिवसा खाली बीड मधील रस्ते रस्त्यातील खड्डे, रोड,



### बीडचे झोपलेले प्रशासन दादा तुम्ही निट करणार कधी!




नाल्या, कचरा, आणि सर्वत्र घाणीचे साम्राज्य बीडमधील जनते साठी नव्हे नाही. ही समस्या कायम बीडकरांनी भोगली आहे. आणि पुढेही कायम दिसते आहे. त्यामुळे पालकमंत्री साहेब आपण बीडला आला आहात त्यामुळे आता तरी बीडच्या मरणासन्न झालेल्या प्रशासनाला आपण आपल्या प्रबळ कामाप्रमाणे खडाडून जागे करणार आहात का.? असा सवाल बीड मधील जनतेला पडलेला आहे. दादा आपण बीडमध्ये ज्या रस्त्याने जाणार येणार आहात एवढेच रस्ते प्रशासन स्वच्छमय आणि खड्ड्यांना मलमपट्टी करून भरून काढते आहे. बाकी शहरातील इतर ठिकाणावरील रस्ते आणि रस्त्यालगत असलेले घाणीचे साम्राज्य जसे ची तसेच नेहमी कायम आहे. यासाठी समस्त बीड वासियांच्या वतीने आपणास एवढीच विनंती आहे की आपण बीड मधील रस्ते आणि घाणीचे साम्राज्य कायम अबाधित ठेवणाऱ्या प्रशासन आणि अधिकारी यांना नियमाने सरळ करावे. आणि बीडचे रस्ते रस्त्यातील खड्डे रस्त्यालगत शहरातील घाणीचे साम्राज्य पासून कायम बिडकरयांना मुक्ती मिळवून द्यावी. त्यानंतरच बीडच्या जनतेला मोठे स्वप्न दाखवावे. अशी बीड मधील जनतेतून इच्छा वेक्त केली जात आहे.

# सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) ट्रेड सुरू – शासकीय आयटीआय आष्टी येथे प्रवेशासाठी संधी

कडा (प्रतिनिधी) श्री गुरुलिंग स्वामी जीबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आष्टी येथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगाशी सुसंगत असा "सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) एक वर्ष कालावधीचा हा नवा ट्रेड प्रवेश सत्र २०२५ पासुन सुरु करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन अधिक माहिती घ्यावी,असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.सध्या संपूर्ण जग पारंपरिक ऊर्जेच्या स्त्रोतांवरून नूतनीकरणयोग्य (रेनेवेबल) ऊर्जा स्त्रोतांकडे वळत आहे. यामध्ये सौरऊर्जा (सोलर एनर्जी) हा एक महत्त्वाचा, स्वच्छ आणि शाश्वत पर्याय मानला जातो. भारत सरकारच्या "हर घर



सौर" योजनेच्या पार्श्वभूमीवर देशात सोलर टेक्निशियनची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना सौर उर्जेची मूलतत्त्वे, सोलर पॅनलची बसवणी, देखभाल व दुरुस्ती, इलेक्ट्रिकल कनेक्शन यांची सखोल माहिती दिली जाते. त्यामुळे विद्यार्थी स्वतंत्र सोलर इंस्टॉलर, मेंटेनन्स टेक्निशियन, प्रोजेक्ट असिस्टंट अशा विविध पदांवर काम करू शकतात. याशिवाय कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधीही मिळते.शासकीय आयटीआय आष्टी ही संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षणाचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू बनली आहे. नव्याने सुरू झालेल्या सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) या ट्रेडमुळे या भागातील युवकांना उज्वल भविष्यासाठी एक नवा मार्ग उपलब्ध झाला आहे.अधिक माहितीसाठी किंवा प्रवेश अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी शासकीय आयटीआय आष्टी येथे तात्काळ संपर्क साधावा.

# ई पिक पाहणी वेळेत पूर्ण करा... तहसीलदार डॉ.येवलेकर साहेब.




प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी ई पिक पाहणे वेळे अगोदर पूर्ण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने कालावधी निश्चित केलेला आहे. यासाठी शेतकऱ्यांनी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत शेतकऱ्यांकडून स्वतःची ई पिक पाहणी, १५ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर पर्यंत, सहाय्यक स्तरावरील अधिकृत ई पीक पाहणी करण्यात येईल. शेतकऱ्यांनी यासाठी ई पीक पाहणी मोबाईल ॲप किंवा महसूल विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरून ही माहिती भरावी. सर्व शेतकऱ्यांनी वेळे अगोदर करावी. असे आवाहन तहसीलदार डॉ. येवलेकर साहेबांनी केले आहे.

# मोसंबी तोडणीसाठी मजुर घेऊन जाणारे विकअप वाहन पलटी; २५ मजुर जखमी, ६ गंभीर



प्रतिनिधी आडुळ (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) : मोसंबी तोडणीसाठी मजूर घेऊन जात असलेले एक विकअप वाहन आडुळ खुर्द शिवारात पलटी झाल्याची गंभीर घटना घडली. या अपघातात २५ मजूर जखमी झाले असून, त्यापैकी ६ मजुरांची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना आडुळ - बालानगर रस्त्यावरील आडुळ खुर्द शिवारात घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी मोसंबी तोडणीसाठी मजुरांना घेऊन निघालेलं वाहन रस्त्याच्या वळणावर असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन उलटले. जखमींवर तातडीने पैठण ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. तर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अधिक तपास सुरू आहे.

# आई वडिल आणि संत सेवा करा – ढोले महाराज

## गोरक्षनाथ टेकडी येथे सचिन महाराज ढोले यांची कीर्तन सेवा

बीड /प्रतिनिधी : सध्याची परिस्थिती पाहता समाजात विरोधी टोकाच्या भूमिका घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मानसन्मान कोणाचा करायचा आणि दूर कोणाला ठेवायचे याचे भान तरुण पिढीला राहिले नाही आई-वडील वृद्धाश्रमात तर गुरूंचाही सन्मान होत नाही अशा परिस्थितीत आजच्या तरुण पिढीने आई-वडील आणि संत सेवा करावी असे आव्हान ढोले महाराज यांनी केले. विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. या सप्ताह मध्ये मंगळवारी कीर्तन सेवा ह.भ.प. सचिन महाराज ढोले यांनी अभंग विवेचन करताना सांगितले आज समाज मध्ये खूप मोठी शोकांतिका आहे. तरणी पोर आई वडिलांना सांभाळत नाही वृद्धाश्रम वाढत आहे. शाळेत तुम्ही सर्व शिकला असाल एक दोन पासून अणुबाँब पर्यंत सर्व काही शिकवतात पण आई वडिलांना सांभाळा हे कोणत्याच अभ्यासक्रमात नाही आई वडिलांची सेवा करा हे फक्त नी फक्त कीर्तनात शिकवतात "जगाच्या पाठीशी तुमच्या जवळ दोन देव आहेत एक आई व दुसरी बाप या दोन देवाची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही . पुढे सांगताना ढोले महाराज म्हणतात की संत कधी सांगत नाहीत की मी संत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत शांतीब्रम्ह एकनाथ महाराज, संत किसन बाबा महाराज, आणि



संत गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी कधीच सांगितल नाही की मी संत आहे. संताचा गुण आहे संत कधीच तुम्हाला सांगत नाहीत आणि जे ऊर बडवून सांगतात मी संत आहे, मला संत म्हणा म्हणणारे कधीच संत नसतात संतच आयुष्याच समाज कल्यानासाठी आहे. माणस आज पैसे सर्वस्व म्हणून जगत आहे . जीवन जगण्यासाठी पैसे आवश्यक आहे पण पैसाच सर्वस्व म्हणून जगणाऱ्या माणसाला पैसे सुख देऊ शकत नाही. आज करोड रुपये संपत्ती असणारे माणस आहेत त्यांना शांत झोप सुधा लागत नाही केवळ पैसा सुख देऊ शकत नाही म्हणून ढोले महाराज यांनी आपल्या कीर्तन सेवेत विवेचन करताना सांगितले की आई वडील व संताची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही. मंगळवारी कीर्तन सेवा समर्पित करताना ढोले महाराज यांना मृदुगसाथ अरुण महाराज कदम व प्रमोद महाराज पदमुले यांनी दिली

आज मंगळवारी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संत ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन सेवा जानकीराम महाराज घुमरे यांनी केले केली .प्रवचन कीर्तन, अभंगवाणी, भारुड, हरिजागर करण्यात आला.

# आज वडवणी मध्ये बाबरी मुंडे , राजाभाऊ मुंडे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते अजितदादा गटात करणार पक्ष प्रवेश,

### बाबरी च्या मागे जनता काय आहे हे आज वडवणी मध्ये दिसणार, मंत्री धनंजय मुंडे पक्ष प्रवेश सोहळ्याला उपस्थित राहणार आहे का नाही तालुक्यात चर्चा

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे विद्यमान पालकमंत्री नामदार अजित दादा पवार आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत, अजित दादा पवार हे आज वडवणी या ठिकाणी ठीक सायंकाळी सहा वाजता, वडवणी शहरातील डॉ,बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी वडवणी नगरीचे माजी नगराध्यक्ष बाबरी मुंडे व राजाभाऊ मुंडे, हे आज भाजप सोडून राष्ट्रवादीच्या अजितदादा गटात प्रवेश करणार आहेत, सदरील पक्षप्रवेश माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे, यामुळे बाबरी मुंडे यांची ताकद मतदारसंघात वाढली असल्याची चर्चा यावेळी दिसून येत आहे, या पक्षप्रवेश वेळेला माजी मंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहणार आहे का नाही यामध्ये पण कार्यकर्त्यांमध्ये चर्चा वर्तवली जात आहे, येणाऱ्या काळात राष्ट्रवादीच्या अजितदादा गटामध्ये माजलगाव विधानसभा मतदारसंघ कार्यकर्त्यांमध्ये सक्रिय राहील, आज बाबरी मुंडे राजेभाऊ मुंडे पक्षप्रवेश अजितदादा गटात करणार आहेत या



पक्ष प्रवेश सोहळ्याला माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे युवा नेते बाबरी मुंडे यांनी सांगीतले आहे





This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com